क्रमांक:एमआयएस-०६१६/सीआर-९०/२०१६/तीन  दिनांक :- ६ मार्च, २०१८

# घोषणा

**विषय:-** आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता अर्ज सादर करणा-या विकलांग उमेदवारांना लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत...

आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या मागील काही जाहिरातींमध्ये विकलांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना, विविध अर्जांचे नमुने, विशेष सूचना, संबंधित शासन आदेश इत्यादी बाबी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, अशी तरतुद करण्यात आली होती. त्यानुसार आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता अर्ज सादर करणा-या सर्व विकलांग उमेदवारांकरीता खालील बाबी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'विकलांग व्यक्ती' या सदरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत:-

(१) विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधीबाबत मार्गदर्शक सूचना

(२) विकलांग व्यक्तीसाठी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज (प्रपत्र-१)

(३) Certificate of Disability in Dominant (Writing) Extremity (प्रपत्र-२)

(४) लेखनिकाची मदत घेण्या-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र (विवरणपत्र-३)

(५) अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करण्या-या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र (विवरणपत्र-४)

(६) संबंधित शासन आदेश

**२.** आयोगामार्फत आयोजित करण्यात येणा-या यापुढील सर्व परीक्षांकरीता विकलांग उमेदवारांनी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याकरीता आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) अर्ज आयोगाच्या कार्यालयास टपालाने अथवा desk3.mpsc@maharashtra.gov.in या ईमेल आयडीवर सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधीची सवलत देय असणार नाही.

**३.** राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०१८ व महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब पूर्व परीक्षा-२०१८ करीता काही विकलांग उमेदवारांनी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याकरीता यापूर्वीच आयोगास अर्ज सादर केले आहेत. अशा विकलांग उमेदवारांनीही आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**४.** आयोगाच्या कार्यालयाकडून लेखी परवानगी प्राप्त झालेल्या उमेदवारांनाच लेखनिकाची मदत घेता येईल अथवा अनुग्रह कालावधी देय असल्यास अनुज्ञेय राहील.

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:- मुंबई